# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक २२ मंगळवार दि.२२ जूलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## सुनील तटकरेंनीच छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला:मनोज जरांगेंचा आरोप, गृहमंत्र्यांकडे कारवाईची मागणी

मुंबई– लातूरमध्ये छावा संघटनेचे नेते विजयकुमार पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या बेदम मारहाणीच्या घटनेने राज्यात खळबळ उडवली आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला, असे मनोज जरांगे म्हणालेत. तसेच या प्रकरणी गृहमंत्र्यांनी कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे रविवारी लातूर दौऱ्यावर आले असताना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर पत्ते फेकत सभागृहात रमी खेळणाऱ्या कृषि मंत्र्याचा राजीनामा घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. छावाचे कार्यकर्ते बाहेर येताच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी घाडगे पाटील यांना मारहाण केली. या प्रकरणावरून अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. या सर्व घडामोडींवर मनोज जरांगे यांनी भाष्य केले आहे.

नेमके काय म्हणाले मनोज जरांगे?

हा हल्ला तटकरे साहेबांनीच घडवून आणला आहे, अशी आमची शंका आहे. हा घडवून आणलेला, पूर्वनियोजित प्रकार आहे. यामध्ये मराठा समाजाविषयी असलेला द्वेष स्पष्टपणे दिसतो. विजय भैय्या हे शेतकऱ्यांचे लेकरू आहे. ते जर आज मागणी करायला गेलेत तर तुम्ही त्यांना मारता. म्हणजे हे तुम्हाला सोपे जाणार नाही. असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. अजित दादांनी कठोरात कठोर कारवाई करून केवळ पदावरूनच नव्हे तर पक्षातूनच हाकालपट्टी केली पाहिजे, अशी मागणी ही मनोज जरांगे यांनी केली आहे.

अशा लोकांमुळे अजितदादांना फटका बसतो

मनोज जरांगे पुढे म्हणाले, हे लोक अजितदादांवरही काळे फासण्याचे काम करत आहेत. अजित पवारांचा राज्यात जनाधार वाढतो आहे, तरुण त्यांच्यामागे उभे राहत आहेत. पण काही नार्कते, अतिरेकी कार्यकर्ते जर पक्षाच्या पदांवर राहिले, तर त्याचा फटका थेट अजितदादांना बसतो. असे लोक पदावर ठेवण्याच्या कामाचे नसतात.

...नाहीतर शेतकरी कोकाटेंच्या अंगावर जाईल

मनोज जरांगे पाटील यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनाही इशारा दिला. ते म्हणाले, कुठल्याही मंत्र्याने आपल्या पदाची गणीमा राखली पाहिजे. आपण कुठल्या पदावर आहोत राज्याच्या जनतेचा आपण प्रतिनिधित्व करत आहोत. मात्र इथून पुढे देखील कोकाटे साहेबांनी आपल्या स्वभावात बदल करण्याची आवश्यकता आहे. नाहीतर शेतकरी वर्ग त्यांच्या अंगावर जाईल. त्यामुळे त्यांनी मंत्री पदाची, विधान भवनाची आणि राज्यातील मायबाप जनतेची गणिमा आखली पाहिजे. नाहीतर पुढच्या काळात देखील त्यांना त्यांच्या पदावरून पायउतार व्हावे लागेल.

## जबरदस्ती आणि दादागिरी चालणार नाही: छावा संघटनेला मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंचा इशार



कोल्हापूर– कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधीमंडळात मोबाइलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्हायरल केला होता. त्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेने रविवारी लातूर येथे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनीत तटकरे यांच्यासमोर संताप व्यक्त करत पत्ते उधळले. त्यानंतर राष्ट्रवादीचे प्रवक्ता सुरज चव्हाण यांच्यासह कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली. याचे पडसाद म्हणून छावा संघटनेने लातूर बंदची हाक दिली. यावर मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी छावा संघटनेलाच इशारा दिला आहे.

जबरदस्ती आणि दादागिरी चालणार नाही

छावा संघटनेने लातूर बंदची हाक दिल्यावर मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी इशारा दिला आहे. ते म्हणाले, लोकशाहीत आंदोलनाचा सर्वांना अधिकार आहे. जिल्हा प्रशासन आंदोलनावर लक्ष ठेवून आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये. त्याच बरोबत सर्वसामान्य आणि व्यापऱ्यांना वेठीस धरले जाऊ नये. ज्यांना स्वतःहून बंदमध्ये सहभागी व्हायचे आहे ते होतील. पण, जबरदस्ती आणि दादागिरी चालणार नाही, यावर जिल्हा प्रशासन लक्ष ठेवून आहे, असा इशारा छावा संघटनेला दिला.

दरम्यान, सूरज चव्हाण यांच्या विरोधात छावा संघटनेसह अनेक मराठा संघटना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. या प्रकरणाची गंभीर दखल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी घेतली. परिणामी, सुनील तटकरे यांच्या दौऱ्यात सूरज चव्हाण यांना सहभागी करण्यात आले नाही.

याशिवाय, अजित पवार यांनी सोमवारी सूरज चव्हाण यांना तातडीने मुंबईत येऊन भेटण्याचे निर्देश दिले होते. मात्र, चव्हाण यांनी कालच्या मारहाणीत आपली बोट फ्रॅक्चर झाल्याचे कारण देत, सध्या उपचारासाठी लातूरमध्येच थांबण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, त्यांनी अजित पवार यांची भेट टाळून कारवाई पुढे ढकलण्याचा प्रयत्न केला का, असा प्रश्न उपस्थित झाला.

सुरज चव्हाण यांचा राजीनामा

दरम्यान, मराठा संघटनांचा रोष वाढत असल्यामुळे अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांची वाट न पाहता थेट ट्विटरवरूनच त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर सुनील तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना सूरज चव्हाण यांचा राजीनामा घेतल्याची माहिती दिली.

## बांगलादेशचे लढाऊ विमान शाळेवर कोसळले; १९ जणांचा मृत्यू, ७० जखमी

ढाका : बांगलादेशच्या हवाई दलाचे एफ–७ हे लढाऊ विमान ढाक्यातील दियाबारी भागात कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. माइलस्टोन कॉलेजच्या कॅम्पसमध्ये असलेल्या शाळेवर हे विमान कोसळले, ज्यामुळे शाळा आणि आसपासच्या परिसरात गोंधळ उडाला आहे. यामध्ये १९ जणांचा मृत्यू झाला असून ७० जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. सोशल मीडियावर या अपघाताचे अनेक व्हीडीओ व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये शाळेतील विद्यार्थी जीव वाचवण्यासाठी इकडे तिकडे धावताना दिसत आहेत. मीडिया रिपोर्टनुसार एफ–७ लढाऊ विमानाने दुपारी १:०६ वाजता उड्डाण केले आणि २४ मिनिटांनी दुपारी १:३० वाजता कोसळले. हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एका वरिष्ठ अधिका–याने घटनेची पुष्टी केली. एपी वृत्तानुसार, लष्कर आणि अग्निशमन अधिका–यांनी सांगितले की, बांगलादेश हवाई दलाचे एक लढाई विमान ढाकाच्या एका शाळेवर कोसळले, ज्यामध्ये किमान १९ जणांचा मृत्यू झाला आणि ७० जखमींना उपचारासाठी ६ रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

## अहमदपूरच्या विविध प्रलंबीत प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे निदर्शने आंदोलन





अहमदपूर :– शहरातील गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आज सम्राट मित्र मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे निदर्शने आंदोलन करण्यात येवून या प्रश्नावर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. प्रामुख्याने अहमदपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापना वरील ट्रॅक्टर चालक मयत अनिल गायकवाड यास तातडीने नुकसान भरपाई द्यावी,घनकरचरा व्यवस्थापन संस्थेने ईपीएफ भरला नसल्याने त्याची अनामत रक्कम जप्त करून संस्थेवर कठोर कारवाई करावी,लाड पागे कमिटीच्या शिफारशी प्रमाणे प्रलंबित सर्व लाभार्थ्यांना लाभार्थ्यांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे,लिंबोटी पाईपलाईन भंगारात विक्रीची वरिष्ठ चौकशी करावी,मरशिवणी तांडा येथील सर्व घरांचे न.प. मालमत्ता रजिस्टरला नोंद घेऊन तातडीने नमुना नंबर आठ देण्यात यावेत, शहरातील इंदिरानगर,चारटांगी जागेवरील अतिक्रमण कायम करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नागरिकांना घरकुल मंजुरीचे प्रक्रिया तातडीने राबवावी, शहरातील आली मज्िद देशमुख वाडा स्मशानभूमी मध्ये दोन हायमस्ट मिनिमष्ट पोल तसेच इदगाह मैदान या ठिकाणी ४ हाय मस्ट मिनी मस्ट लाईट पोल मंजूर करावे,शहरात ट्रॅफिक सिग्नल उभे करावेत, नजीराबाद कॉलनी,अफ्फान कॉलनी, मरशिवनी तांडा आदी ठिकाणी पिण्याच्या पाण्याची अडचण असून नवीन पाईपलाईन तातडीने टाकण्यात यावी, अल्पसंख्यांक विकास निधीतून किंवा न.प.च्या कुठल्याही योजनेतून उस्मान बिन अफ्फान शाळेला संरक्षित भिंत मंजूर करावी,नगरपरिषद पाणीपुरवठा विभागातील संबंधित कंत्राटदारास वर कठोर कारवाई करावी,बस स्टँड समोरील शौचालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करून ती कार्यान्वित करावी, नगरपरिषदेच्या पत्रिगाळ्याचा लिलाव सदोष असून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय समिती नेमून दुकानाचे गळ्याचे भाडे ठरवावेत, अहमदपूर सर्वे नंबर ४ वरील प्रलंबित असलेल्या सर्व कपालनाम्याचे काल मर्यादित स्वरूपात वाटप करावे, नगरपरिषद मालमत्ता रजिस्टर नोंदीसाठी एकूण मूल्यांकनाच्या तीन टक्के एवढी रक्कम नागरिकाकडून वसूल करण्यात येते ते तातडीने रद्द करावे,नगरपरिषद अहमदपूर मध्ये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा मनमानी पद्धतीने ठराव केले जात असून जाणीवपूर्वक पक्षपात विषमता होत असल्याचे चित्र असून यापुढे शहरात समान पद्धतीने निधीचे वाटप करावे,नगरपरिषदेच्या विविध निविदा ऑफलाइन ऑनलाईन या नियमबाह्य पद्धतीने केल्या जात आहेत त्या तातडीने नियमाप्रमाणे कराव्यात,घनकचऱ्यावर काम करणाऱ्या सर्व कामगारांचे गेल्या अनेक महिन्यापासून प्रलंबित असलेली पगार तातडीने देण्यात यावी,संजय गांधी निराधार योजना–श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांचे थकीत अनुदान तातडीने वितरित करावे तसेच त्यांची काल मर्यादित स्वरूपात केवायसी युद्ध पातळीवर करावीत आदी महत्त्वांच्या प्रश्नांचा यामध्ये समावेश होता. सम्राट मित्र मंडळाच्या धरणे निदर्शनेच्या नंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.तसेच प्रशासन हे दिवसेंदिवस लोकाभिमुख होणे गरजेचे असताना सुद्धा अहमदपूरमध्ये मात्र प्रशासनाचा मनमानी पद्धतीने कारभार चालू आहे यावर तातडीने अंकुश लावावा अशा पद्धतीची आग्रही मागणी केली अन्यथा यापुढे सुद्धा अतिशय उग्र स्वरूपात आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी,माजी नगरसेवक शेषरावजी ससाने,सामाजिक कार्यकर्ते गफारखान पठाण,शेख रहीमभाई शेखूभाई,पठाण जाबेरभाई, तालुका अध्यक्ष शरद सोनकांबळे,अजय भालेराव,शेख नूरभाई,बजरंग गायकवाड,सचिन बानाटे, मोहम्मद पठाण,जिलानी मनियार,शादूल तांबोळी, शहेबाज शेख,जावेद पठाण,दिलदार शेख,बालाजी मस्के,प्रकाश गायकवाड, अनिता गायकवाड आदींची उपस्थिती होती.



राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित विलासरावजी देशमुख यांना साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या १ ऑगस्ट जयंतीदिनी उपस्थित रहावे यासाठी निमंत्रण देताना साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूरचे अध्यक्ष सचिन्दं कांबळे, कैलास कांबळे, सुनील बसपुरे, अशोक देडे, राज क्षीरसागर, सुरेश चव्हाण, आनंद वैरागे, रघुनाथ कुचेकर, अंगद गायकवाड, अश्विन कांबळे आदीसह प्रमुख पदाधिकारी दिसत आहे.

## लोकशाही मार्गाने आदोलन करणाऱ्यांना सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्याकडून मारहान अत्यंत दुदैवी आणि निषेधार्य घटना सत्ताधाऱ्यांकडून लोकशाहीचा गळा घोटण्याचे प्रयत्न माजी मंत्री, आमदार अमित देशमुख

### शासकीय वास्तूमध्ये राजकीय पत्रकार परीषद कशी?

शासकीय कामकाजानिमीत्त शासकीय पदावर असलेल्या पदाधिकारी, अधिकारी यांच्याकडून शासकीय कार्यालय किंवा इमारतीत पत्रकार परीषदेचे आयोजन करणे समजू शकतो परंतू राजकीय पक्षाची भुमिका आणि कार्यक्रमाची माहीत देण्यासाठी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परीषदेचे आयोजन करण्याची ही नवी प्रथा कोणी पाडली आणि त्यास कोण परवानगी देत आहे असा प्रश्नही आमदार अमित देशमुख यांनी यावेळी उपस्थित केला.

विधानभवन परीसरात घडलेल्या हाणामारीच्या घटनेनंतर किमान विश्रामगृहाचा राजकीय वापर टाळला असता तर कदाचीत ही घटना घडली नसती. भविष्यात राजकीय वापरासाठी शासकीय परीसर उपलब्ध करुन देऊ नसे अशी मागणीही यानिमीत्ताने आमदार देशमुख यांनी केली.



लातूर / प्रतिनिधी:– लोकशाही मार्गाने आंदोलन करुन जनतेच्या भावना प्रतिकात्मक पध्दतीने व्यक्त करणाऱ्या छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी बेदम मारहान करण्याची लातूरात घडलेली घटला अत्यंत दुदैवी असून आम्ही या घटेनेचा तीव्र शब्दात निषेध करीत असल्याचे सांगून मारहान करणाऱ्यांना त्वरीत अटक करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी मंत्री, तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. या संदर्भाने बोलतांना आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबद्दल असंवेदनशील वक्तव्य करणारे कृषीमंत्री श्री माणिकराव कोकाटे विधानसभेत कामकाज चालू असताना ऑनलाइन रमी जुगार खेळत असल्याचे चित्र प्रसिद्ध झाले आहे. अशावेळी जनतेमध्ये प्रक्षोभनिर्माण होणे स्वभाविक आहे, लातूरमध्ये सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे आलेले असताना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या अंगावर पत्त्याची पाणे फेकली, खरे तर संतापलेल्या जनतेच्या प्रतिक्रियेची ही एक प्रतीकात्मक कृती होती, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मात्र छावा संघटनेचे प्रांतअध्यक्ष विजयकुमार घाडगे व इतर पदाधिकारी यांना बेदम मारहाण केली आहे. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेऊन केलेली ही मारहान निषेधार्यच आणि लोकशाहीचा गळा घोटणारी आहे. लोकशाहीच मंदीर म्हणून ओळख असलेल्या विधानभवनात नुकतीच हाणामारीची घटना घडली. त्यातून कोणताही बोध न घेता. सताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये हा प्रकार घडवून आणला आहे. यावरून विदयमान सरकार आणि सत्ताधारी मंडळीची मानसीकता ही उघड झाली आहे असेही आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

सदरील घटना लातूरच्या संस्कृतीला तर अजिबात शोभणारी नसल्याचे नमूद करुन पून्हा येथे असे प्रकार घडू नयेत यासाठी मारहाण करणाऱ्या या कार्यकर्त्यावर कडक कारवाई करावी, यानिमीत्ताने राज्यात किमान कायदा आणि सुव्यवस्था शिल्लक आहे, याचा पुरावा शासनाने द्यावा अशीही मागणी आमदार अमित देशमुख यांनी केली आहे.

# संपादकीय

## रेल्वेचे प्रवासीहितैषी पाऊल

भारतीय रेल्वेने देशभरातील सुमारे ७४ हजार डब्यांमध्ये आणि १५ हजार इंजिनांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ तांत्रिक यश नव्हे, तर प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. भारतातील रेल्वे व्यवस्था ही जगातील सर्वांत मोठ्या रेल्वे व्यवस्थांपैकी एक असून रोज कोट्यवधी प्रवासी रेल्वेचा वापर करतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर देशात लोकांचे हालचाल माध्यम म्हणून कार्यरत असणार्या रेल्वे व्यवस्थेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस आणि विश्वासार्ह उपाययोजना असणे अपरिहार्य आहे.

गेल्या काही वर्षांत रेल्वेगाड्यांमध्ये चोरी, लूटमारी, महिलांशी छेडछाड, प्रवाशांचे सामान चोरी जाणे, प्रवाशांवर हल्ला होणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः रात्रीच्या गाड्यांमध्ये किंवा काही विशिष्ट मार्गांवर या घटनांचे प्रमाण इतके वाढले आहे की, त्या मार्गांवरील प्रवासाला लोक घाबरू लागले आहेत. रेल्वे प्रशासनाने अनेक वेळा सुरक्षा दलाची नियुक्ती करून आणि तपासणी वाढवून या घटनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. काही प्रमाणात त्यात यशही आले आहे; परंतु तरीही अनेक घटना अशा घडतात ज्या क्षणात घडून जातात आणि त्याचे पुरावे मिळणे कठीण होते. त्यामुळे गुन्ह्यांना रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना ओळखण्यासाठी अशी कोणती तरी तंत्रज्ञानाधारित सुविधा हवी होती जी सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षेला हातभार लावेल.

सीसीटीव्ही हा पर्याय रेल्वे प्रशासनाने योग्य वेळेस आणि योग्य प्रकारे स्वीकारलेला आहे. या कॅमेर्यांमुळे प्रत्येक डब्याच्या दरवाजाजवळून येणार्या-जाणार्या प्रत्येक प्रवाशाचा चेहरा कॅमेर्यात कैद होईल. यामुळे एखादा गुन्हा घडला, तर त्या वेळेच्या दृश्याचं विश्लेषण करून संशयिताची ओळख पटवणे शक्य होईल. हे दृश्य केवळ तपासासाठी उपयुक्त ठरणार नाही, तर न्यायालयात साक्ष आणि पुरावा म्हणूनही वापरता येईल. त्यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यात सीसीटीव्ही तंत्रज्ञान खूपच मोलाचं ठरणार आहे. विशेष म्हणजे, यामध्ये वापरण्यात येणार्या तंत्रज्ञानाची गुणवत्ता इतकी उत्कृष्ट आहे की, १०० किलोमीटरपेक्षा अधिक वेगाने धावणार्या रेल्वेमध्ये, अगदी कमी प्रकाशातही चेहर्यांची स्पष्ट नोंद करता येते. यामध्ये नाईट व्हिजन कॅमेरे, डिजिटल झूम, मोशन डिटेक्शन आणि क्लाऊड स्टोरेज यासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत.

या निर्णयाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे, प्रवाशांमध्ये सुरक्षा आणि विश्वासाची भावना निर्माण होईल. आज अनेक प्रवासी प्रवास करताना आपल्या सामानाची, महिलांची किंवा वृद्धांची काळजी करत असतात. अनेकजण रात्रीच्या प्रवासाला टाळू लागले आहेत. अशा परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेरे सतत देखरेख करत असतील, तर गुन्हेगारच आधीच घाबरून जातील आणि कोणत्याही गैरकृत्याला हात घालणार नाहीत. ही भीतीच गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे मुख्य साधन ठरेल. शिवाय अशा उपकरणांचा अवलंब केल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेबद्दल आणि उत्तरदायित्वाबद्दल सामान्य जनतेमध्ये सकारात्मक भावना निर्माण होते.

पूर्वी अनेक वेळा अशी उदाहरणे समोर आली की, प्रवाशाचे सामान चोरीला गेले अथवा महिलांची छेडछोड केली जाऊनही त्याचा काहीच मागोवा लागला नाही. कारण, ना कोणती दृश्ये उपलब्ध होती ना कोणती ओळख; पण आता जेव्हा एखादी घटना घडेल तेव्हा रेल्वे पोलिसांना आणि तपास अधिकार्यांना तपासासाठी ठोस आधार मिळेल. सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या योजनेचा मोठा फायदा म्हणजे भविष्यात होणार्या गुन्ह्यांना आधीच रोखणे शक्य होईल.

# सत्यासत्याचा गोंधळ

आजचं युग हे माहितीच्या प्रचंड ओघाचं युग आहे. सोशल मीडिया, न्यूज चॅनल्स, व्हॉट्सअॅप, युट्युब अशा विविध माध्यमांनी लोकांच्या विचारांवर आणि भावनांवर मोठा प्रभाव टाकला आहे. कुठलीही गोष्ट तात्काळ पसरते आणि ती कोणतीही खात्री न करता लोक सत्य म्हणून स्वीकारतात. त्यामुळे सध्याच्या काळात असत्याला सत्य म्हणून सिद्ध करणं फारच सोपं झालं आहे. पण दुसरीकडे, खरं सत्य सिद्ध करणं मात्र खूपच कठीण बनलं आहे. ही स्थिती का निर्माण झाली, ती दुरुस्त कशी करता येईल आणि अशीच जर परिस्थिती राहिली तर काय होईल यावर चिंतन गरजेचं आहे. सध्याच्या माहितीच्या विस्फोटक काळात असत्य सहजतेनं पसरतं. त्यामागे अनेक कारणं आहेत. एकतर, माहितीचा इतका गोंधळ आहे की सामान्य माणसाला कोणती बातमी खरी आणि कोणती खोटी हे वेगळं करणं अवघड वाटतं. दुसरं कारण म्हणजे असत्य गोष्ट बहुतेक वेळा अतिशय भावनिक, नाटकी, भीतीदायक किंवा आक्रमक असते. त्यामुळे ती लोकांच्या मनावर पटकन ठसते. तिसरं म्हणजे पुनरावृत्ती जेव्हा एकच खोटी गोष्ट अनेक माध्यमांतून, वारंवार सांगितली जाते, तेव्हा ती लोकांना खऱ्यासारखी वाटते. त्यामुळे खोटं बोल पण रेटून बोल हेच बंधनरहित तत्व माणसांच्या बोलण्यात आणि विचारांत डोकावू लागतं. याउलट, सत्य हे बऱ्याचदा गुंतागुंतीचं असतं. ते सादर करताना संयम, पुरावे, विचारसरणी, आणि विश्लेषण लागते. लोकांना झटपट निष्कर्ष हवे असतात. सत्याच्या प्रक्रियेला लागणारा वेळ आणि श्रम त्यांना नको असतो. त्यामुळे सत्य ऐकून घेण्याची, समजून घेण्याची तयारी समाजात कमी होते. शिवाय, सत्य बहुतेक वेळा 'असुविधाजनक' असतं. ते कोणाच्या तरी फायद्याला बाधा आणणारं असतं. त्यामुळे ते दाबलं जातं, झाकून ठेवलं जातं, किंवा त्याविरुद्ध नकारात्मक प्रचार केला जातो. यामुळे सत्य बोलणाऱ्यावरच संशय घेतला जातो, त्याला अपमानित केलं जातं, त्याचे हेतू बदनाम केले जातात. हे सगळं घडतं कारण आपल्या समाजात काही मूलभूत त्रुटी आहेत. एक म्हणजे आपण चौकसपणाऐवजी ऐकून बोलण्याची सवय लावून घेतलेली आहे. दुसरं म्हणजे आपली शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांना विचार करणं, विश्लेषण करणं, सत्य तपासणं या गोष्टी शिकवत नाही. तिसरं म्हणजे असत्य प्रचार अनेकदा धर्म, जात, इतिहास यासारख्या भावनिक विषयांशी जोडला जातो आणि मग सत्य सांगणाऱ्याला शत्रूप्रमाणे पाहिलं जातं. याशिवाय माध्यमंही आता खऱ्या बातम्यांपेक्षा सनसनाटी, भडक गोष्टींना प्रसिद्धी देतात. त्यामुळे समाजात सत्याचा आवाज कोंडून टाकला जातो. जर ही स्थिती अशीच राहिली, तर समाजात गंभीर परिणाम होतील. एकतर, समाजामध्ये गटातट वाढतील, विश्वासाचा ऱ्हास होईल, लोक एकमेकांवर संशय घेतील. दुसरं म्हणजे लोकशाही धोक्यात येईल. मतदार चुकीची माहिती घेऊन चुकीचे निर्णय घेतील. तिसरं म्हणजे चांगल्या, सज्जन, प्रामाणिक लोकांचा समाजात आदर उरणार नाही. अशा समाजात कुणीही सत्याच्या बाजूने उभा राहायला धजावणार नाही. शिवाय, चुकीच्या माहितीच्या आधारे दंगली, मोब लिंचिंग, बहिष्कार यासारख्या गोष्टी वाढतील. सर्वसामान्य जनता फसवली जाईल आणि देशाचा सर्वांगीण विकास खुंटेल. या सगळ्याला उत्तर आहे समाजात विचारशीलपणा वाढवणं. लोकांनी कोणतीही गोष्ट डोळसपणे ऐकावी, तिचा विचार करावा, विविध बाजू तपासाव्यात. शिक्षणपद्धतीत मुल्यशिक्षण, तर्कशुद्ध विचार, मीडिया साक्षरता यांचा समावेश व्हायला हवा. सत्य मांडणाऱ्या लोकांना समाजाने आधार दिला पाहिजे. माध्यमांनी जबाबदारीने बातम्या द्यायला हव्या. शासन आणि तंत्रज्ञानाने फेक न्यूज आणि अफवांवर नियंत्रण ठेवावं. सत्य हे केवळ तर्काचं नव्हे तर संस्काराचंही फलित आहे. सत्यासोबत उभं राहणं म्हणजे नुसता बौद्धिक निर्णय नाही, तर तो एक नैतिक आणि सामाजिक निर्धार असतो. आपल्या आजूबाजूला जेव्हा कुणी खोटं बोलताना दिसतं, अफवा पसरवताना दिसतं, तेव्हा त्याला विरोध करणं अगदी सभ्यतेने का होईना हीही सत्याच्या बाजूने उभं राहण्याची कृतीच आहे. हे कृतीशील विवेकशीलपणच समाजाला असत्याच्या अंधारातून सत्याच्या उजेडात घेऊन जाऊ शकतं. आजच्या काळात अशा व्यक्तींची गरज आहे, जे स्वतःला फसवणार नाहीत, इतरांनाही फसवू देणार नाहीत. जे स्वतः तपासतील, विचार करतील आणि मगच मत बनवतील. कारण सत्याची लढाई ही तलवारीने नाही, तर विवेकाने लढली जाते. ही लढाई समाजाचा आत्मा जागा ठेवणाऱ्या प्रत्येक जणाने आपल्या स्तरावर लढली पाहिजे. जेव्हा सामान्य माणूसही म्हणेल की माझं मत सत्याच्या आधारावर असावं, तेव्हाच खऱ्या अर्थानं समाजाची प्रगती सुरू होईल. शेवटी, सत्य आणि असत्य यांची ही लढाई जुनी असली तरी आज ती नव्या स्वरूपात समोर आली आहे. असत्य हे झगमगणारं, आकर्षक असलं तरी त्यामागे अंधार असतो. सत्य हे संयमी, कठीण, आणि अनाकर्षक वाटू शकतं, पण त्यामागे स्थैर्य, ज्ञान आणि उजेड असतो. त्यामुळे आपण प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून विचारशील बनावं, सत्याचा शोध घ्यावा, आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवावं. कारण शेवटी, सत्य हे जिंकतंच. त्याला वेळ लागतो, संघर्ष लागतो पण त्याचं तेज अखंड असतं.

**********

- प्राचार्य डॉ बालाजी लाहोरकर, श्रीमती सिंधुताई जाधव महाविद्यालय, मेहकर, जिल्हा बुलढाणा

# बँकांच्या खासगीकरणावर प्रश्न

१९ जुलै १९६९ रोजी बँकिंग क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण केले त्याला आज ५६ वर्षे पूर्ण होत आहेत. सध्या सार्वजनिक बँका जनतेच्या सेवेकडून खासगी हिताकडे जात आहेत.

भारताच्या आर्थिक विकासात बँकिंग क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. स्वातंत्र्योत्तर काळात बँकांना सामाजिक उद्दिष्टांसाठी कार्य करणेही गरज होते. त्यामुळे १ जानेवारी १९४९ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १ जुलै १९५५ मध्ये इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन स्टेट बँक ऑफ इंडिया या सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकेची निर्मिती झाली.

त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली १९ जुलै १९६९ रोजी अलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, देना बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड बँक ऑफ इंडिया, यूको बँक या १४ प्रमुख खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यानंतर १५ एप्रिल १९८० रोजी तत्कालीन सरकारच्या आदेशांनुसार आंध्र बँक, कॉर्पोरेशन बँक, न्यू बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब अँड सिंध बँक, विजया बँक या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

दुसर्या टप्प्यातील राष्ट्रीयीकरणामुळे, भारत सरकारने भारतातील सुमारे ९१% बँकिंग व्यवसाय नियंत्रित केला. सन १९५१ ते १९६८ या दरम्यान वाणिज्य बँकांनी वितरित केलेल्या कर्जात उद्योगाचा वाटा जवळजवळ दुप्पट झाल्याने शेतीला एकूण कर्जाच्या २% पेक्षा कमी कर्ज मिळाले.तसेच अन्न सुरक्षेत देशाला स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने भारतात हरित क्रांती सुरू झाल्यानंतर शेतीला भांडवलाची आवश्यकता होती. त्यामुळे बँका खासगी क्षेत्राच्या मालकीच्या आणि व्यवस्थापित असल्याने बँकिंग सेवांचा आवाका मर्यादित असून, सर्वसामान्यांना बँकिंग सेवेची सुविधा उपलब्ध नव्हती.

यामुळे सरकारने संसाधनांचे निर्देश अशा प्रकारे करणे आवश्यक होते की अधिकाधिक सार्वजनिक फायद्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे देशाला नक्कीच मोठा फायदा झाला. राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे बँकांच्या निधीत वाढ झाली आणि त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती सुधारली तसेच कार्यक्षमता वाढली. देशाच्या ग्रामीण, कृषी क्षेत्राला चालना देण्यास मदत झाली. यामुळे रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली. सरकारने बँकांना मिळालेल्या नफ्याचा वापर लोकांच्या कल्याणासाठी केला जाऊ लागला. स्पर्धा कमी होऊन कामाची कार्यक्षमता वाढली.

राष्ट्रीयकृत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना स्थिरता व नफा मिळवून देण्यासाठी सरकारने भारतीय बँकिंग उद्योगातील विविध सुधारणांचे व्यवस्थापन करण्यासाठी एम. नरसिंहम यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन केली होती. कालांतराने रिझर्व्ह बँकेने १० खासगी क्षेत्रातील बँका स्थापन करण्यासाठी परवाना दिला. या बँका म्हणजे, अॅक्सिस बँक, एचडीएफसी बँक, इंडसइंड बँक, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा बँक, बंधन बँक, आयडीएफसी फर्स्ट बँक, आयडीबीआय बँक, करूर वैश्य बँक, सिटी युनियन बँक इत्यादी. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे फायदे पाहता सार्वजनिक क्षेत्रातील बँका दुर्गम भागातही असतात आणि भौगोलिकदृष्ट्या दूर असलेल्या किंवा कमी प्रवेशयोग्य असलेल्या प्रदेशांमध्ये त्यांच्या सेवांचा विस्तार करतात. बँकांना सरकारचा पाठिंबा असल्यामुळे ग्राहकांना पैसे गुंतवणुकीबद्दल सुरक्षितता वाटते.




सार्वजनिक क्षेत्रातील बँका अनेकदा स्पर्धात्मक दराने कर्ज देतात, त्यामुळे कर्ज अधिक सुलभ होते. सरकारी मालकी आणि नियमांमुळे ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करून सार्वजनिक क्षेत्रातील बँका आर्थिक मंदीच्या काळात स्थिरता दाखवतात. बँका या ग्राहक सेवेला प्राधान्य देत असल्याने विविध श्रेणीतील ग्राहकांना समाधान देतात. देशाच्या उद्योगात वाटा असलेल्या ठेवीच्या बाबतीत भारतातील एकूण बाजारपेठेतील जवळपास ५९% हिस्सा असतो थेट परकीय गुंतवणूक करण्यासाठी. या बँका २०% पर्यंत थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देतात. तर खासगी बँकांचे फायदे पाहता खासगी बँका ग्राहकांना जलद सेवा देतात आणि ग्राहकांचे प्रश्न सोडवतात. या बँकांचे जास्तीत जास्त नफा मिळवण्याचे उद्दिष्ट असते. सहसा बँकेच्या ग्राहकांची संख्या कमी असते.

मध्यंतरी सरकारने भारतीय स्टेट बँकेच्या इतर समूह बँकांचे विलीनीकरण केले. त्यानंतर इतरही काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचेही सरकारने विलीनीकरण केले. याचा नाही म्हटलं तरी बँकेच्या सर्व ग्राहकांना नाहक त्रास झाला. सरकारने सामान्य माणसाचे बँकेशी नाते जोडले जाण्याच्या दृष्टीने तसेच आर्थिक लाभाच्या दृष्टीने जनधन खाती उघडण्याचे आवाहन केले. याचा बँकिंग क्षेत्रावर मोठा बोजा पडला असे आजही अनेकजण म्हणत आहेत. आता ही जनधन खाती सर्व बँकांची मोठी डोकेदुखी ठरत आहे.

मध्यंतरी पंजाब नॅशनल बँक व कॅनरा बँक या बँकेने बचत खात्यात किमान शिल्लक ठेवण्याची अट शिथिल करून ग्राहकांना मोठा दिलासा दिला आहे. हा नियम भविष्यात इतर बँकांही लागू करतील अशी अपेक्षा आहे. पण खासगी बँकेत आजही किमान रक्कम शिल्लक ठेवण्याची अट आहे. सध्या देशात खासगीकरणाचे वारे वाहत असून, याचा बँकांनाही मोठ्या प्रमाणात फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर संपूर्ण बँकिंग क्षेत्राचे खासगीकरण झाले तर सामान्य माणूस बँकिंग क्षेत्राच्या विकासाच्या वर्तुळाबाहेर जाण्याची शक्यता आहे.

याशिवाय ठेवी हाताळणार्या बँका सुरक्षित राहतील का? सन १९६९ ते २०२० या काळात खासगी क्षेत्रातील अडचणीत सापडलेल्या २५ बँकांना इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वाचवले होते. जर बँकांचे खासगीकरण झाले तर मनमानीचा कारभार नक्कीच वाढेल. लोकांना कर्जे मिळण्यास कठीण जाईल, सर्वसामान्यांच्या नोकर्यांचा प्रश्न निर्माण होईल. देशातील डीएचएफएल, पंजाब अँड महाराष्ट्र बँक, येस बँक, कराड बँक, रुपी बँक व सी.के.पी. बँक या अपयशी ठरलेल्या बँकांबद्दल कोणीही विश्लेषण करते का? सरकारतर याबाबत भाष्य करण्याचे कायमच टाळत आहे.

# घटत्या प्रजननदराची चिंता

एका अभ्यासाचा निष्कर्ष असा आहे की श्रीमंत, विकसित देशांत प्रजननदराचा उलटा प्रवास सुरू झाला असून तेथे आता गरजेपेक्षा कमी मुलं जन्माला घातली जात आहेत.

पाश्चात्य देशांतला प्रजननदर सातत्याने घसरत आहे. अमेरिकेतील आकडेवारी तर खूप बोलकी आहे. तेथे आज प्रजननदर १.६ आहे. हा दर लोकसंख्या टिकवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक असलेल्या २.१ दरापेक्षा फार कमी आहे. याचा अर्थ असा की आज अमेरिका-युरोपसमोर लोकसंख्या घटणे ही फार मोठी समस्या आहे. तसं पाहिलं तर ही समस्या जपानलासुद्धा भेडसावत आहे. जपान आणि चीन हे आशिया खंडातले महत्त्वाचे देश. कालपरवापर्यंत यांची लोकसंख्या वाढत होती. आता दोन्ही देशांत लोकसंख्या घटायला लागली आहे. यातही भारताला चीनची खास दखल घ्यावी लागते. कालपरवापर्यंत लोकसंख्येबद्दल चीन आपल्या पुढे होता. आता तशी स्थिती राहिली नाही. २०२४ सालची जी आकडेवारी उपलब्ध झाली आहे त्यानुसार चीनमध्ये लग्न करणार्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. एकेकाळी चीन सरकार 'कुटुंब नियोजन करा' म्हणून विविध कार्यक्रम राबवत असे. आता चीन सरकार तरूण पिढीने लग्न करावं, मुलं होऊ द्यावी, यासाठी योजना राबवत आहे.

आधुनिक अर्थशास्त्र सांगतं की आर्थिक प्रगती झाली की लोकांना मजा करण्यासाठी अधिकाधिक वेळ हवा असतो. म्हणून त्यांना मुलं नकोशी वाटतात. मुलं झाली की त्यांच्या संगोपनात वेळ आणि पैसा जातो. त्यापेक्षा एकच अपत्य असावं. म्हणजे मग स्वतः चं जीवन जगायला वेळ आणि पैसा उपलब्ध असेल. ही वस्तुस्थिती मागच्या शतकात युरोप- अमेरिकेत होती. आशियातील दोन मोठे आणि प्राचीन संस्कृती असलेले देश म्हणजे भारत आणि चीन. भारत १९४७ साली स्वतंत्र झाला तेव्हा आपली लोकसंख्या सुमारे ३४ कोटी होती. चीनमध्ये माओची क्रांती १९४९ साली यशस्वी झाली तेव्हा चीनची लोकसंख्या ५४ कोटी होती. त्यानंतर भारत आणि चीन यांची लोकसंख्या सतत वाढतच गेली. २००० साली चीनची लोकसंख्या होती १३० कोटी. हा आकडा २०२५ साली १४२ कोटी झाला. भारताची लोकसंख्या २००० साली १०६ कोटी होती तर २०२५ साली लोकसंख्या १४६ कोटी आहे. म्हणजे आता आपलीलोकसंख्या चीनच्या लोकसंख्येपेक्षा चार कोटीने जास्त आहे!

चीनने लोकसंख्या काबूत आणली असली तरी आता मात्र लोकसंख्या वाढवण्यासाठी शासकीय पातळीवरून खास प्रयत्न सुरू झालेले आहेत. असा प्रकार आशियातील आणखी एक महत्त्वाचा देश जपानबद्दलही घडत आहे. १९५० साली जपानची लोकसंख्या ८.४ कोटी होती. ही लोकसंख्या २००० साली १२.७ कोटी झाली. आता २०२५ साली ही लोकसंख्या घटली असून १२.३१ कोटी आहे. म्हणजे चीनप्रमाणेच जपानची लोकसंख्यासुद्धा घटत आहे. जपानच्या समस्येच्या नेमकी विरुद्ध समस्या भारतासमोर गेली अनेक वर्षे आहे. ती म्हणजे सतत वाढत जाणारी लोकसंख्या. एका अंदाजानुसार भारतात दररोज सुमारे पन्नास हजार मुलं जन्माला येतात. १९४७ ते २०२१ एवढ्या ७४ वर्षांत भारताची लोकसंख्या शंभर कोटीने वाढली आहे. देशाची लोकसंख्या आणि त्याचे देशाच्या एकूण प्रगतीवर होणारे परिणाम याची जगाला जाणीव करून देण्याचे श्रेय ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ थॉमस माल्थस यांना दिले जाते.

आज ही परिस्थिती फक्त जपानची आहे, असं मात्र नाही. युरोपातील अनेक देशांची लोकसंख्या घटत आहे. अशा देशांना आता 'ज्येष्ठ नागरिकांचा देश' असं म्हटलं जात आहे. ही स्थिती फार भयानक आहे. जर देशात नवी मुलं जन्माला येणार नसतील तर देशाच्या आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो. देशात जर नव्या रक्ताचे तरूण नसतील तर उत्पादन प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो. आज युरोपातील अनेक देश आणि जपानची हीच स्थिती झालेली आहे. आजच्या तरूण पिढीला लग्न करण्याची इच्छा नाही, ते सरळ 'लिव्हइन' हा पर्याय स्वीकारतात. चुकून कोणी लग्न केलं तर ते दाम्पत्य मुलं होऊ देत नाही. अशा स्थितीत देशाची लोकसंख्या कमी कमी होत जाणं हे अगदी स्वाभाविक आहे. यातून निर्माण होणार्या समस्यांना त्या देशाच्या नेत्यांना तोंड द्यावे लागते. निवृत्त होणार्या ज्येष्ठांच्या पिढीची जागा घेण्यास तरूण पिढी तयार असावी लागते. तशी ती जर नसली तर मग असे तरूण बाहेरच्या देशातून आयात करावे लागतात. आज भारत, पाकिस्तान, बांगलादेश वगैरेसारख्या कुशल कामगार मोठ्या प्रमाणात असलेल्या देशांतून युरोपात स्थलांतर करणारे कितीतरी तरूण दाखवता येतात. एकेकाळी असा प्रवाह आखाती देशांकडे वाहत होता. आता हा प्रवाह युरोपकडे वळला आहे.

ही समस्या अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांना फारशी भेडसावत नाही. याचे महत्त्वाचे कारण इंग्रजी भाषा! या इंग्रजी भाषिक देशांत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतून असंख्य तरूण सहजतेने स्थलांतर करत असतात. त्यामुळे स्थानिकांची लोकसंख्या वाढत जरी नसली तरी बाहेरून आलेले कुशल कामगार या देशांची गरज भागवतात. अमेरिकेची २०१०-२०१९ ची आकडेवारी समोर ठेवली तर असे दिसते की या नऊ वर्षांत अमेरिकेच्या वाढलेल्या लोकसंख्येत सात टक्के स्थलांतर केलेले लोक होते. या टक्केवारी ऐवजी आकडेवारी सादर करायची झाली तर २०१० साली १ कोटी ४६ लाख स्थलांतरित अमेरिकेत दाखल झाले तर २०१९ हाच आकडा १ कोटी ५६ लाख एवढा झाला. असे प्रचंड मोठे स्थलांतर जपान, हॉलंड, स्पेन वगैरे देशांत होत नाही. नेमकं याच कारणासाठी या देशांना 'कमी कमी होत जाणारी लोकसंख्या आणि त्याचा आर्थिक प्रगतीवर होणारे परिणाम' या नव्या समस्येचा सामना करावा लागत आहे. या स्थितीत भारतात परिस्थिती काय आहे? गेली काही वर्षे भारताचीलोकसंख्यासुद्धा कमी गतीने पण वाढत आहेच. आहे त्या लोकसंख्येला काम देण्यास, रोजगार निर्माण करण्यात आपली व्यवस्था कमी पडत असते.

# स्वयंपाक घरातील ‘या’ पदार्थांचा वापर करून बनवा रवाळ कलाकंद, नोट करून स्वादिष्ट गोड पदार्थ

श्रावण महिना सुरु होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. श्रावणात नेहमीच काहींना काही गोड पदार्थ बनवले जातात. तांदळाची खीर, शेवयांची खीर, रसमलाई, साबुदाणा खीर इत्यादी अनेक गोड पदार्थ बनवले जातात. मात्र नेहमीच तेच ठराविक पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन आणि टेस्टी पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. अशावेळी स्वयंपाक घरातील तीन पदार्थांचा वापर करून रवाळ कलाकंद बनवू शकता. मिठाईच्या बॉक्समधील सगळ्यांच्या आवडीचा पदार्थ म्हणजे कलाकंद. कलाकंद तुम्ही इतर कोणताही गोड पदार्थ बनवताना वापरू शकता. मात्र नेहमीच बाजारातून विकत आणलेला आणि प्रक्रिया करून तयार केलेला कलाकंद खाण्यापेक्षा घरी सोप्या पद्धतीमध्ये तुम्ही कलाकंद बनवू शकता. हा कलाकंद बनवण्यासाठी जास्तीचा वेळ लागत नाही. चला तर जाणून घेऊया कलाकंद बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

दूध

पनीर

साखर काजू

बदाम

सुकलेल्या गुलाबाच्या पाकळ्या

कृती:

कलाकंद बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये दूध गरम करण्यासाठी ठेवा. दूध थंड असताना त्यात थोडस पाणी टाकवे.

दुधाला उकळी येऊन दूध व्यवस्थित आटून घट्ट झाल्यानंतर त्यात किसलेलं पनीर घालून व्यवस्थित मिक्स करा.

पनीर टाकल्यानंतर दूध सतत चमच्याने ढवळत राहा. कढईला दूध आणि पनीर चिटकणार नाही याची योग्य काळजी घ्यावी.





पनीर आणि दूध घट्ट झाल्यानंतर त्यात साखर घालून मिक्स करा. तयार केलेले मिश्रण व्यवस्थित घट्ट झाल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

मोठ्या भांड्याला तूप लावून खाली काजू बदामाचे तुकडे टाकून वरून तयार केलेले कलाकंद मिश्रण ओतून व्यवस्थित सेट करा.

१५ ते २० मिनिटांनंतर कलाकंदचे तुम्हाला हवे तसे तुकडे करून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला कलाकंद.

# जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची मागणी. भिम आर्मीचे राज्यपालांना निवेदन..




निलंगा / प्रतिनिधी :– महाराष्ट्र राज्यात फडणवीस सरकारने जनसुरक्षा कायदा विधिमंडळात मंजूर करून घेतला आहे. तो कायदा तत्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी भीम आर्मीच्या वतीन राज्यपालांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, सदरील जनसूरक्षा कायदा हा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारा असून, हा कायदा भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(अ) नुसार नागरिकांना मिळालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. जनसुरक्षा कायदा लागू झाल्यास सामान्य नागरिक,पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व युवक यांच्या लोकशाही अधिकाराव गदा आणणारा आहे. शिवाय लोकशाहीत जनतेसाठी काम करणाऱ्यावर या कायद्याप्रमाणे कारवाई झाली तर पुन्हा सार्वजनिक कामासाठी कोणी रस्त्यावर उतरू शकणार नाहीत. या कायद्यामुळे लोकशाही प्रक्रियेवर गदा येईल. या कायद्याचा वापर व्यक्तीस्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे हा कायदा संविधानाच्या मूल्यातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा घातक शत्रू आहे असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की,अत्याचार, दडपशाही व विचारांची मुस्कटदाबी रोखण्यासाठी व लोकशाही प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी हा कायदा लागू करू नये,तर हा कायदा तत्काळ रद्द करण्यात यावा. जनतेच्या हितासाठी व संवेधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या कार्यक्षेत्रात जनसुरक्षा कायदा लागू करू नये अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष अतूल सोनकांबळे,राज लोखंडे,अनिल सुरवसे अनिल कांबळे,शुभम सूर्यवंशी,दिगंबर सूर्यवंशी,किशोर सुरवसे,निखिल कांबळे,अर्जुन जाधव, मनोज कांबळे, प्रथमेश सूर्यवंशी, बालाजी सुरवसे,अक्षय ससाणे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राग ,द्वेष ,मोह हेच आपले खरे शत्रू . भिक्खु महावीरो थेरो.

लातूरः भगवान बुद्धानी बुद्धत्वप्राप्तीनंतर मानवाच्या दुखःचे मुळ शोधले. जगाचा कर्ताकरवीता कोण याचा विचार न करता ,माणसाने दुखःमुक्त कसे व्हावे यावर विशेष भर दिला.बुद्ध म्हणाले बाहेरच्या जगात आपला शत्रू कोणीच नाही. आपल्या मनात जो क्लेश रुपी शत्रू आहे ज्यांना राग,द्वेश,मोह म्हटले आहे,तेच आपले प्रमुख शत्रू आहेत आसे प्रतिपादन भिक्खु महावीरो थेरो यांनी वैशाली बुद्धविहार बोध्दनगर लातूर येथे बुद्ध धम्म वर्षावास पुनीत पर्वानिमित्त आयोजित उपासक / उपासिका संस्कार शिबीरात केले.



पुढे बोलताना म्हणाले,जेवढे वाईट तुमचे बाहेरील शत्रू करणार नाहीत ,तेवढे वाईट तुमचे कुमार्गाला गेलेले मन करते.जेवढे चांगले आपले मातापिता ,आप्तेष्टकरणार नाहीत तेवढे भले पवित्र मार्गाला गेलेले मन करते. मनाचे विकार हेच दुःखाचे मुळ कारण आहे. जे मन अनित्य आहे .पंचइंद्रीया द्वारे मानवाला त्रुष्णेचा गुलाम करायला लावते त्या मनाचे व सतत बदलणार्या शरीराचे आपण मालक नाहीत. म्हणुनमानवी दुःखास कारणीभुत आसणार्या अविद्या व त्रुष्णा यांचा नाश करा तरच माणुस सुखी होईल आसे विचार मांडले,

रविवार रोजी सकाळी १० –०० ते दु. ४ –००या वेळेत हे संस्कार शिबीर संपन्न झाले. प्रथम भ.बुद्ध व डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करुन बुद्धवंदना घेउन कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी महाविरणचे उपअभियंता शीलरत्न सुर्यवंशी ,सेवानिव्रुत्त इंजिनियर डि, के, मोरे यांचा सत्कार करण्यात आला. एमपीएससी परीक्षेत उज्वल यश संपादन केल्याबद्दल सिद्धांत गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.या शिबीरास आयु. दिक्षाराणी –विनोद खटके यांनी भोजनदान दिले.यावेळी माजी नगरसेवक सचीन मस्के ,भारतीय बौद्धमहाभेच्या जिल्हाध्यक्षा आशा चिकटे ,राजु काआबळे ,गौतम चिकाटे ,सुर्यभान लातूरकर,दामु कोरडे ,त्रंबक कवठेकर ,हरिश्चंद्र सुरवसे,उत्तम गायकवाड ,कुमार सोनकांबळे ,असित कांबळे,लताबाई चिकटे ,शकुंतला नेत्रगावकर,शीला वाघमारे,शारदा वाघमारे,सविता चिकाटे , लता गायकवाड ,लता कांबळे ,लता श्रंगारे,जनाबाई सोनवणे,मिरा शेळके,निलुबाई कांबळे आदीसह लातूरशहरातील उपासक/उपासीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.धम्मपालन गाथा व भन्तेजींच्या आशिर्वचनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सुत्रसंचलन केशव कांबळे यांनी केले.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला ०१ लाख ५ हजार रुपयाच्या १९ ग्राम सोन्याच्या दागिन्यासह अटक. ०२ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :– घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला ०१ लाख ५ हजार रुपयाच्या १९ ग्राम सोन्याच्या दागिन्यासह अटक. ०२ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.



याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसा पासून मुरुड मधील घराचे रात्रीच्या वेळी कडीकोंडा तोडून आतमध्ये प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिने चोरी केल्याची घटना घडल्या होत्या. त्यावरून पोलीस ठाणे मुरुड येथे अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना सदरच्या पथकाला रात्रीच्या वेळी कडीकोंडा तोडून घरामध्ये प्रवेश करून सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक १९ जून रोजी पथकाने लातूर मधील पाच नंबर चौक परिसरातून एकाला ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव लक्ष्मण अशोक पवार,वय २५ वर्ष, राहणार भोसा तालुका जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातून त्याने मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी घराचे कडीकोंडे तोडून,घरामधील सोन्या–चांदीचे दागिने चोरल्याचे कबूल करून त्याने त्याच्या इतर साथीदारासह चोरी करून त्याचे हिश्याला आलेले १९ ग्रॅम सोने नमूद आरोपीकडून हस्तगत करण्यात आले असून पोलीस ठाणे मुरुड हद्दीतील चोरीचे दोन गुन्हे उघडकिस आले आहेत.

नमूद आरोपीने चोरलेल्या मुद्देमालासह ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता मुरुड पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, तुळशीराम बरुरे, राजेश कंचे, गणेश साठे,गोविंद भोसले,श्रीनिवास जांभळे केली आहे.

# सकाळच्या नाश्त्यासाठी ५ मिनिटांमध्ये बनवा चहा मलाई टोस्ट, सोशल मीडियावरील व्हायरल रेसिपी

हल्ली सोशल मीडियावर अनेक नवनवीन गोष्टी व्हायरल होत आहेत. वेगवेगळे प्रँक किंवा चॅलेंज व्हिडिओ, वेगवेगळ्या रेसिपी इत्यादी अनेक गोष्टी सगळ्यांचं पाहायला खूप जास्त आवडतात. इंस्टाग्रामवर किंवा इतर अनेक ठिकणी पाहिलेल्या नवीन रेसिपी घरी बनवल्या जातात. त्यात जगभरात प्रसिद्ध असलेला पदार्थ म्हणजे चहा मलाई टोस्ट. सकाळच्या किंवा संध्याकाळच्या नाश्त्यात अनेक लोक टोस्ट किंवा ब्रेड बटर खातात. अनेक लोक चहा मलाई टोस्ट हा पदार्थ बनवून त्याचे फोटो शेअर केले जात आहेत. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सकाळच्या नाश्त्यासाठी चहा मलाई टोस्ट बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. नेहमीच कांदापोहे किंवा शिरा, उपमा खाऊन कंटाळा आल्यानंतर चहा मलाई टोस्ट तुम्ही बनवू शकता.चला तर जाणून घेऊया चहा मलाई टोस्ट बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

ब्रेड

दुधावरची साई

साखर

बटर

चहा

दूध

वेलची पावडर





पाणी

कृती: चहा मलाई टोस्ट बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी गरम करण्यासाठी ठेवा. पाणी गरम झाल्यानंतर चहा पावडर, साखर आणि वेलची पावडर घालून चहा उकळण्यासाठी ठेवा.

चहा व्यवस्थित उकळ्यानंतर त्यात दूध घालून चहा व्यवस्थित उकळवून घ्या. चहाला व्यवस्थित उकळी आल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तवा गरम करून त्यावर बटर लावून घेतलेले ब्रेड दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजून घ्या. दोन्ही बाजूने ब्रेड तव्यावर भाजून झाल्यानंतर कुरकुरीत होईपर्यंत भाजा.

ब्रेड भाजून झाल्यानंतर त्यावर दुधाची साय घालून व्यवस्थित पसरवून घ्या. त्यानंतर त्यावर साखर घालून वरून साय लावून घेतलेला ब्रेड ठेवा.

तयार केलेला चहा मोठ्या वाटीमध्ये काढून त्यावर तयार केलेला मलाई टोस्ट टाकून खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला चहा मलाई टोस्ट. हा पदार्थ लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

# बॉलिवूड अभिनेत्री अदिती रावची फेव्हरेट डिश khagina घरी कशी बनवायची? अवघ्या २ मिनिटांची रेसिपी

बॉलीवूड अभिनेत्री अदिती राव हैदरी ही केवळ आपल्या अभिनयानेच नव्हे, तर तिच्या एलीगंट व्यक्तिमत्वामुळेही ओळखली जाते. पारसी कुटुंबात वाढलेल्या अदितीला पारंपरिक पारसी जेवण खूप आवडतं, आणि त्यातील एक खास पदार्थ आहे खगिना! खागिना म्हणजे पारसी स्टाईल अंडा भुर्जी. खागिना (घहरसळपर) ही एक अंड्याची भाजी आहे, जी हैद्राबादी पदार्थांमध्ये प्रसिद्ध आहे.

मागील एका मुलाखतीत अदिती रावने आपल्या डिशबद्दल बोलताना खगिना पदार्थांविषयी सांगितले. तर हा पदार्थ कसा बनवायचा याची रेसिपी देखील तिने शेअर केली. आज आपण हीच रेसिपी जाणून घेणार आहोत. संध्याकाळच्या नाश्त्यासाठी हा पदार्थ एक उत्तम पर्याय आहे. शिवाय ही रेसिपी इतकी झटपट तयार होते की घाईगडबडीचच्या वेळी तुम्ही याला पटकन बनवून आपल्या पोटाची भूक शमवू शकता. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य

अंडी – ३

कांदा – २ मध्यम, बारीक चिरलेला हिरव्या मिरच्या – २, बारीक चिरून

लसूण – ३–४ पाकळ्या, बारीक चिरून

लाल तिखट – ट टीस्पून

तेल – २ टेबलस्पून

मीठ – चवीनुसार

कोथिंबीर – सजावटीसाठी

कृती

खागिना तयार करण्यासाठी सर्वप्रथम कांदा बारीक अर्धगोल आकारात कापून चिरून घ्या





यांनतर हिरव्या मिरच्या उभ्या चिरून घ्या

आता गॅसवर एक पॅन ठेवून त्यात तेल टाका

तेल गरम झाले की यात चिरलेला कांदा आणि हिरव्या मिरच्या छान परतून घ्या

कांदा आणि मिरच्या शिजल्यानंतर यात ३ अंडी फोडा

लक्षात ठेवा, तुम्हाला ही अंडी मिक्स करायची नाहीयेत तर फक्त अंडी फोडून पॅनवर टाकायची आहेत

यानंतर पॅनवर एक झाकण ठेवा आणि काही मिनिटे मंद आचेवर याला शिजू द्या

आता एका खलबत्त्यात लसूण आणि मसाला टाकून एक ठेचा आणि एक पेस्ट तयार करा

तयार पेस्ट शिजवलेल्या अंड्यावर टाका

शेवटी यावर चिरलेली कोथिंबीर टाका आणि गॅस बंद करा, ही स्टेप ऑप्शनल आहे

तयार खागिना चपाती किंवा ब्रेड अथवा भाकरीसोबत खाण्यासाठी सर्व्ह करा

# जेवणात डाळ खाल्ल्यानंतर लगेच ॲसिडिटी होते? पोटाच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी ‘या’ पद्धतीने शिजवा डाळ

भारतीय स्वयंपाक घरात नेहमीच पारंपरिक पद्धतीने बनवले जाणारे पदार्थ मोठ्या प्रमाणावर खाल्ले जातात. जेवणात नेहमीच डाळ, भात आणि चपाती, भाजीसह इतर अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. जेवणाच्या ताटातील सगळ्यांच्या आवडीचा पदार्थ म्हणजे डाळ भात. जेवणात डाळभात नसेल तर जेवण जेवल्यासारखेच वाटत नाही. मुगडाळ, तूरडाळ, मसूरडाळ इत्यादी अनेक वेगवेगळ्या डाळींचा वापर करून तिखट फोडणीची डाळ बनवली जाते. डाळीमध्ये फायबर, प्रथिने, लोह, झिंक, फोलेट आणि मॅग्नेशियम इत्यादी शरीरासाठी आवश्यक असलेले सर्वच घटक आढळून येतात. शाहाकारी लोक आहारात डाळीचे सेवन मोठ्या प्रमाणावर करतात. निरोगी आरोग्यासाठी आहारात डाळींचे सेवन करणे अतिशय फायद्याचे मानले जाते



जेवणातील पदार्थांमध्ये सगळ्यात महत्वाचा पदार्थ म्हणजे डाळ. पण काही वेळा डाळ खाल्ल्यामुळे पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. अनेक लोकांमध्ये पोट फुगणे, जड वाटणे, जळजळ होणे किंवा वारंवार ढेकर येण्याची समस्या उद्भवू लागते. डाळीचे सेवन केल्यामुळे बऱ्याचदा अपचनाच्या समस्या उद्भवतात. यामागील प्रमुख कारण म्हणजे डाळ व्यवस्थित न शिजवणे, शिळ्या डाळीचे सेवन, अतिरिक्त मसाल्यांचा वापर केल्यामुळे पदार्थाची गुणवत्ता अतिशय खराब होऊन जाते, ज्याचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला डाळ खाल्यामुळे अपचनाच्या समस्या का उद्भवतात? यावर कोणते उपाय करावेत? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

डाळ खाल्ल्यानंतर गॅसेस, सिडिटी किंवा ब्लोटिंगची समस्या का वाढते:

डाळींमध्ये फायबरचे अधिक असते. त्यामुळे ज्यांच्या शरीरात फायबरचे प्रमाण कमी असते, त्यांना डाळ खाल्ल्यानंतर लगेच अपचनाची समस्या उद्भवू लागते. डाळ खाल्ल्यानंतर पोट फुगणे किंवा गॅस किंवा बद्धकोष्ठतेसारख्या अनेक समस्या उद्भवू लागतात. याशिवाय डाळींमध्ये ऋजउ्च–झी नावाचे साखरयुक्त घटक आढळून येतात. त्यामुळे फायबर कमी असलेल्या लोकांच्या शरीरात लगेच गॅस किंवा पित्ताची समस्या उद्भवते. त्यामुळे शरीरात फायबर असणे आवश्यक आहे.

डाळ खाल्यानंतर सिडिटी होऊ नये म्हणून काय करावे?

डाळ बनवताना प्रत्येक घरात वेगवेगळ्या पद्धतीने डाळ बनवली जाते. काही डाळ फोडणी देऊन खातात तर कधी लोक फोडणी न देता शिजवलेल्या डाळीचे भातासोबत सेवन करतात. चुकीच्या पद्धतीने डाळ शिजवल्यास अपचनाच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच पोटात ॲसिडिटी, गॅस आणि बद्धकोष्ठता वाढू लागते.

ॲसिडिटीची समस्या टाळण्यासाठी डाळ शिजवताना हिंगाचा वापर करावा. हिंगाच्या वापरामुळे पचनक्रिया सुधारते आणि पचनाच्या कोणत्याही समस्या उद्भवत नाहीत. डाळीमध्ये हिंग घातल्यास कार्बोहायड्रेट्सचे विघटन होते, ज्यामुळे पोटात गॅस तयार होत नाही. हिंगाची फोडणी देऊन बनवलेली डाळ सहज पचन होते आणि पचनाच्या कोणत्याही समस्या उद्भवत नाहीत.

डाळ सहज पचन होण्यासाठी डाळीला फोडणी देताना त्यात मोहरी,जिरं, लसूण आणि कढीपत्त्याची फोडणी द्यावी.यामुळे पचनाची समस्या उद्भवत नाही. गॅस, पोट फुगणे किंवा जडपणा इत्यादींपासून आराम मिळवण्यासाठी डाळीला तुपाची फोडणी द्यावी.

डाळमुळे पोटफुगी का होते?

डाळीमध्ये ऑलिगोसॅकराइड्स भरपूर प्रमाणात असतात, ही एक प्रकारची साखर आहे जी मानवी शरीर पूर्णपणे पचवू शकत नाही. या साखर मोठ्या आतड्यात जातात जिथे बॅक्टेरिया त्यांना आंबवतात आणि उप–उत्पादन म्हणून वायू तयार करतात.

डाळ खाल्ल्यानंतर पोटफुगी कमी करण्यासाठी टिप्स:

डाळ शिजवण्यापूर्वी काही तास भिजवल्याने ऑलिगोसॅकराइड्सचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते आणि ते पचण्यास सोपे होते. टेम्पेह सारखे आंबवलेले शेंगदाणे पचण्यास सोपे असतात कारण आंबवण फुगण्यास कारणीभूत असलेल्या काही संयुगांचे विघटन करते.

# तिर्रट जुगार खेळणाऱ्या १२ जणांवर गुन्हा दाखल. ६,७०,२४०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लातूर :- तिर्रट जुगार खेळणाऱ्या १२ जणांवर गुन्हा दाखल. ६,७०,२४०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहीम राबवून अवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीतील लेबर कॉलनी परिसरातील एका घरावर छापा मारून तिर्रट नावाचा



जुगार खेळत व खेळवीत असताना १२ जणांना ताब्यात घेतले आहे.

यामध्ये ०६,७०,२३०/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गांधी चौक पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लेबर कॉलनी येथे १९/०७/२०२५ रोजी २२.०० वाजण्याच्या सुमारास छापा टाकण्यात आला. यादरम्यान १२ आरोपी तिर्रट नावाचा जुगार रुपये लावून खेळत व खेळवीत असताना सापडल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आले आहे. यामध्ये रोख रक्कम, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण ०६,७०,२३० रुपयाचा चा मुद्देमाल जप्त केला आहे.

यामध्ये आरोपी १)फारुखऊर्फपाशामाईयुसुफमोमीन, वय ५८ वर्षे रा. लेबर कॉलनी लातुर, २) गफार अब्दुलसाब मणीयार, वय ५८ वर्षे रा. हत्तेनगर लातुर. ३)शादीक गफुर बागवान वय-३१ वर्षे, रा. ताजुद्दिनबाबा दर्गा, लातूर. ४)सलिम अब्दुलवहाब कुरेशी वय ५८ वर्ष, रा. काझीमोहल्ला.लातूर ५) मुस्तफा इस्माईल चौधरी वय-५४ वर्षे, रा. प्रकाशनगर, लातुर. ६) आसीफ इस्माईल पठाण, वय ५४ वर्षे रा. लेबरकॉलनी लातुर. ७) महेश श्रीराम सुर्यवंशी, वय ५० वर्षे रा. लेबरकॉलनी, लातुर ८)अन्वर पाशा सय्यद वय-३५ वर्षे रा. ईस्लामपुरा, लातूर. ९)मिरमहमद मिररजा सय्यद, वय ४५ वर्षे रा. झिंगणअप्पागल्ली लातुर. १०) महताब कलीम बागवान, वय २८ वर्षे रा. बागवान गल्ली, लातुर. ११)वासीक एजाजअहमद सिद्दीकी, वय ५० वर्षे, रा. लेबर कॉलनी लातुर. १२)अब्दुलसत्तार मदारसाहब शेख, वय ५७ वर्षे रा. खोरेगल्ली लातुर.

असे बेकायदेशिर रित्या स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी तिर्रट नावाचा जुगार खेळत असताना जुगाराच्या साहित्य, रोख रक्कम, मोबाईल व वाहने असे एकुण ०६,७०,२३०/-रुपयाच्या मालासह मिळुन आल्याने त्यांच्या विरुध्द कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम नुसार पोलीस ठाणे गांधी चौक येथे गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास गांधी चौक पोलीस करीत आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे , युवराज गिरी, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, बोचरे यांनी केली आहे.

# माझं लातूर परिवाराच्या पाठपुराव्याला यश तृतीयपंथीयांच्या तक्रार आणि समस्या निवारण समितीचे गठण

लातूर :- लातूर शहर आणि परिसरात काही तृतीयपंथीयांकडून सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, वाहनधारक यांची आर्थिक पिळवणूक करून अश्लील शिवीगाळ होत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या. या गंभीर सामाजिक विषयावर तोडगा काढण्यासाठी माझं लातूर परिवारात चर्चाही झाली होती या चर्चे त अनेक मान्यवरांनी सहभाग घेत यासंबंधी जिल्हा प्रशासनाने यावर उपाययोजना कराव्यात असा सूर उमटला होता. परिवारातील क्रियाशील सदस्य तथा तरुण विधीज्ञ ड. प्रविण पालकर यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून या गंभीर सामाजिक विषयावर प्रशासकीय स्तरावर उपाययोजना कराव्यात अशी विनंती केली होती. माझं लातूर परिवाराच्या या निवेदनाची तात्काळ दखल घेत जिल्हा प्रशासनाने जिल्हास्तरीय तृतीयपंथीयांच्या तक्रार आणि समस्या निवारण समिती चे गठण केले असून या समितीची पहिली बैठक दिनांक २२ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात होत आहे. माझं लातूर परिवारात केवळ चर्चा होत नाहीत तर अनेक सामाजिक प्रश्नांची उकल त्या चर्चेतून होत असते आणि प्रशासनानेही नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देत माझं लातूर परिवाराच्या सामाजिक कार्यास मोलाची साथ दिली आहे. ड. प्रविण पालकर यांनी स्वतः पुढाकार घेत माझं लातूर परिवाराच्या वतीने दिलेल्या निवेदनाची तत्काळ दखल घेऊन प्रशासनाने ही समिती स्थापन केली त्याबद्दल माझं लातूर परिवाराच्या वतीने प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नवीन पिढीला खरा बुद्ध समजावून सांगण्यास आपण कमी पडतोय - प्रा. प्रतीक पवार

मुंबई :- फोटोफ्रेममध्ये शांत, ध्यानमग्न अवस्थेत असलेले तथागत गौतम बुद्ध आपण जसेच्या तसे स्वीकारलेत परंतु खरे बुद्ध व त्यांचे विचार आपल्यापासून व आपल्या नवीन पिढीपासूच कोसो दूर राहिले आहेत किंबहुना आपण ते समजून घेतलेच नाही त्यामुळे येणाऱ्या पिढ्यान बुद्ध समजावून सांगण्यात आपण कमी पडतोय, चित्रकाराने आपल्या कल्पनाशक्तीने बुद्धाचे चित्र रेखाटले त्यामागे त्याचा दृष्टिकोन स्थल, काल, वेळ परत्वे वेगळा असू शकतो पण आपण कट्टरपंथी झाल्याने आपल्या मनात क्लेश, तिरस्कार निर्माण होतो व त्याचेच रूपांतरण पूढे संघर्षात होते आपण संधीमार्ग स्वीकारत नाही तडजोड करत नाही त्यामुळे बुद्ध विचारधारेपासून आपण दूर लोटले जात आहोत, बुद्ध हे विज्ञानवादी असून ते मोक्षदायी नसून मार्गदता आहेत त्यांनी आपल्या विचारधारेतून अनेकांना आदर्श माणूस घडवलं आहे, आपण ही त्याच विचारधारेचे पाईक होऊन तडजोड करायला शिकले पाहिजे, मुलांना उचशिक्षण देऊन त्यांना खऱ्या बुद्धांचा विचार त्यांना समजावून पुढील वाटचाल केली पाहिजे आता चळवळीची दिशा कालपरत्वे बदलली पाहिजे, आपली स्वप्ने ही मर्यादित न ठेवता मोठी स्वप्ने उराशी बाळगून आपण क्षेत्रात अग्रेसर झालं पाहिजे असे प्रतिपादन प्रा. प्रतीक पवार वर्षावास प्रवचन मालिकेचे प्रमुख व्याख्याते या नात्याने आंबेडकरी चळवळीतील तरुणांची दिशा आणि धम्म या विषयावर बोलत असता केले.




बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे त्या प्रवचन मालिकेचे तिसरे पुष्प सरसेनानी सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर बा. मोरे यांनी आपल्या धीरगंभीर पहाडी आवाजात केले तर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून देत प्रस्ताविक सादर केले प्रास्ताविक सादर करताना त्यांनी स्मारकाच्या निधी करता बौद्धाचार्य, बौद्धाचार्यांना त्यांनी सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन केले सोबतच समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रामनेर शिबिरात ज्यांना सहभागी व्हायच आहे अश्यांनी नावनोंदणी करावे असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात सभापती आनंदराज आंबेडकर यांनी ज्यावेळी मी बार्टी येथील पीएचडी विद्यार्थ्यांच्या फेलोशिपचा प्रश्न हाती घेऊन सोडवला त्यावेळी विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र आदी विभागातील ६०० विद्यार्थी होते परंतु कोकणातील एकही उमेदवार मला आढळला नाही त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात कोकण पिछाडीवर आहे की काय असा विचार मनाला स्पर्शून जातो, आपण फक्त पीटी केसचा विचार करतो माझ्यानंतर माझा मुलगा माझ्या जागेवर कामाला लागेल इतकाच संकुचित विचार करीत आपण मुलाच्या भविष्याचा विचार न करता त्याचे भविष्य सरळसरळ अंधारात लोटत आहोत परंतु आता व्यापक विचार करीत आपल्या मुलाला उच्चशिक्षित करून उच्चपदावर पाठवल पाहिजे ही मानसिकता आपल्यात निर्माण झाली पाहिजे, विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र, खानदेश, माणदेश आदी विभागातील विद्यार्थी जशी प्रगती करत आहेत तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवून कोकणातील विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात भरारी घेतली पाहिजे सर्व क्षेत्रात अग्रसेर होण्याकडे वाटचाल केली पाहिजे, विकसनशील अश्या सामंजस्य व मध्यम मार्गाचा अवलंब करून प्रगती केली पाहिजे असे मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे, कोषाध्यक्ष नागसेन गमरे, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, मनोहर सखाराम मोरे, चंद्रमनी तांबे, अतिरिक्त चिटणीस श्रीधर साळवी, विठ्ठल जाधव, प्रकाश करूळेकर, यशवंत कदम, सिद्धार्थ कांबळे, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, तुकाराम घाडगे, अतुल साळवी, चिंतामणी जाधव, महेंद्र पवार, सुशीलाताई जाधव, सिद्धार्थ कांबळे, विश्वस्त मंडळ, मध्यवर्ती कार्यकारिणी, सर्व शाखांचे पदाधिकारी, सभासद, महिला मंडळ, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटच्या सत्रात दिवंगत बौद्धाचार्यांना साश्रु नयनांने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सरस्वती कन्या प्रशालेत कु.स्नेहल कोकाटे चा सत्कार सोहळा संपन्न

केज/प्रतिनिधी सरस्वती व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम महाविद्यालयाचे प्रा.जालिंदर कोकाटे सर यांची कन्या व सरस्वती कन्या प्रशालेची विद्यार्थिनी कु.स्नेहल कोकाटे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत असिस्टंट इंजिनिअर क्लास - २ पदी निवड झाल्याबद्दल सरस्वती कन्या प्रशालेच्या मु.अ.तथा प्राचार्या श्रीम.घुले मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख अतिथी मा.श्री.रामहरी गुंड व श्री.सुनील थोरात यांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक श्री.मगर सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

हा प्रेरणादायी सत्कार सोहळा सरस्वती कन्या प्रशालेच्या शेकडो विद्यार्थिनींनी अनुभवला.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्रा.श्री.राहुल कुलकर्णी सरांनी केले तर श्री.मगर सर,श्री.जोगदंड सर, यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, तिच्या यशाचे कौतुक करताना तिचा सरस्वती कन्या प्रशालेतील इयत्ता ५ वी ते १० वी चा प्रवास, तिने घेतलेले कष्ट,तिची जिद्द व मेहनत याचा लेखाजोखा मांडला.सत्काराला उत्तर देताना कु.स्नेहल कोकाटे हिने शालेय जीवनातील आठवनींना उजाळा देत, गुरुजनांचे मार्गदर्शन, अभ्यासातील सातत्य, आई वडील यांचा भक्कम पाठिंबा व आशीर्वाद यामुळेच हे यश संपादन करू शकले असे नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना श्रीम.घुले मॅडम यांनी तिचे तोंडभरून कौतुक केले ,कुठलाही क्लास न लावता,कुठल्याही मोठ्या शहरात जाऊन तयारी न करता, घरी बसून अत्यंत



चिकाटीने तिने हे यश संपादन करून आपल्या शाळेचे नाव उज्वल केल्याचे नमूद केले.कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींनी स्नेहल कडून प्रेरणा घेऊन पुढील काळात सर्व विद्यार्थिनींनी आपले करिअर करावे व सत्कारास पात्र व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.या वेळी सरस्वती कन्या प्रशाला, सरस्वती उच्च माध्यमिक , एम.सी.व्ही.सी.चा सर्व स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.शेवटी श्री.कुलकर्णी सर यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# उपमुख्याध्यापक अरुण कांबळे यांना पीएच.डी.

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील शिंदी येथील मूळ रहिवासी तथा छत्रपती संभाजीनगर येथील जय भवानी विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपमुख्याध्यापक अरुण लक्ष्मणराव कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा' या विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली .डॉ. डी. व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डॉ.बाबसाहेब आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन: एक अभ्यास (१९२० ते १९७० )' या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला आहे. अरुण कांबळे हे गेल्या ३३ वर्षापासून इंग्रजी विषयाचे अध्यापन करत आहेत. ते इंग्रजी विषयाचे राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक , लसाकम या सामाजिक संघटनेचे राज्य प्रवक्ते आहेत . त्यांचा अनिगुत काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे . मासिक लहूशक्ती, मासिक तथागत चे त्यांनी अनेक वर्ष संपादन केले आहे .विविध विषयांवर अनेक वर्तमानपत्रातून



त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. स्काऊट गाईड चळवळीच्या माध्यमातून आय.एस.टी. म्हणून ते जपान येथे २३ व्या आंतरराष्ट्रीय जांबोरी त सहभागी झाले होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. २६ जून रोजी नुकतेच त्यांना राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गाडेकर , सचिव रंगनाथराव जाधव सदस्य शिवाजी देवरे, प्राचार्य डी.एस.जाधव ,पर्यवेक्षिका बी.एस . हिवरेकर , प्रो.डॉ.दिलीप अर्जुने, प्रो. डॉ.सुनिल नरवडे , डॉ.एम.जी.सदामते, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्राचार्य बी.जी. खोडवे, प्राचार्य ए. के. वाघ , एन.एम. राठोड ,एस. पि. चेपट, ए . बी. जाधव, एम.एस.रांजणीकर , किशोर गेडाम एन.जे. पठाण,मधुसूदन कांडलिकर ,सुशील कुंबेफळकर , डॉ . गणेश गावंडे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड,के. ई. हरिदास, माजी न्या. डी. आर. शेळके, श्रावणदादा गायकवाड, डॉ . भारत सोनवणे,प्रा. अरुण चंदनशिवे , अँड. वसंत शेजुळ आदींनी त्यांचे अभनंदन केले.

# वंचितचे युवा नेते शरद धीवार यांचा वाढदिवस विविध ठिकाणी मित्र परिवाराच्या वतीने साजरा

सर्व समाजातील नागरिकांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवणारे व प्रशासनाच्या विविध कार्यालयातील नागरिकांच्या विविध अडचणी सोडून शासनाच्या विविध योजनांचा सर्वसाधारण नागरिकांना लाभ मिळवून देणारे वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते तथा दलित चळवळीतील लढाऊ कार्यकर्ता अर्थात केज तालुक्याचा पँथर म्हणजेच शरद धीवार होय अशा प्रतिक्रिया मित्रपरिवार व कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दिल्या आहेत.

बॅनर,पोस्टर बाजी, फटाक्याच्या अतिशय बाजीवर खर्च करण्यापेक्षा तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे तळागाळातील नागरिक व तरुणापर्यंत पोहोचण्याचे काम करण ही काळाची गरज आहे. त्यामुळे मी माझ्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता तथागतांचे व महामानवांचे विचार तळागाळापर्यंत रुजवण्याची गरज आहे म्हणून मी माझा वाढदिवस हा साध्या पद्धतीने साजरा केला आहे. माझ्या सहकाऱ्यांनी आणि मित्र परिवारांनी त्यांचाही वाढदिवस असाच साध्या पद्धतीने साजरा करावा. युवा नेते शरद धीवार



केज/प्रतिनिधी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते शरद धीवार यांचा वाढदिवस केज शहरात विविध ठिकाणी मित्र परिवाराच्या वतीने साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. भारतीय बौद्ध महासभा अर्थात मात्र संस्थेच्या वतीने भारतीय बौद्ध महासभा केज तालुका शाखा व शहर शाखेच्या वतीने शहरातील भीम नगर येथील वेळूवन बुद्ध विहारात तर दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे व संघटना, पक्षाच्या आणि पत्रकार बांधवांच्या वतीने पंचायत समिती येथे तर विविध पक्षाच्या व संघटनेच्या आणि मित्र परिवाराच्या वतीने केज शहरात अनेक ठिकाणी शरद धीवार यांचा वाढदिवस साध्या पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. बॅनर,पोस्टरबाजी, डीजे, फटाक्याची अतिश बाजी न करता अनावश्यक खर्चाला बगल देत सध्या पद्धतीने वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते तथा दलित चळवळीचे पँथर म्हणून सर्वांना परिचित असणारे शरद धीवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, वंचित चे ज्येष्ठ नेते धनराज सोनवणे, दलित अन्य अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे, पत्रकार तात्या गवळी, काँग्रेसचे युवा नेते राहुल वाव्हळे, भीमशक्ती संघटनेचे केज तालुका उपाध्यक्ष अशोक सरवदे, अनिल डोंगरे, युवा नेते लखन हजारे, प्रवीण मस्के, नाना धीवार सर, पत्रकार विवेक बनसोड, किरण जोगदंड, आशोक धीवार, वंचित चे युवा नेते अमोल हजारे, सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड, शिवकुमार मस्के सर,राहुल इनकर, गणेश गालफाडे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व विविध संघटनेचे,पक्षाचे पदाधिकारी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE